| | नवी मुंबई महानगरपालिका | NAVI MUMBAI MUNCIPAL CORPORATION |
|---|---|---|
| | पामबीच जंक्शन, भुखंड क्र.1 सेक्टर.15, सी.बी.डी, बेलापूर नवी मुंबई -400 614 दुरध्वनी क्रमांक :2756 7181 | Palm Beach Junction, Plot No. 1 Sector-15 A, C.B.D., Belapur NAVI MUMBAI - 400 614 |


**अत्यंत महत्वाचे / तातडीचे**

जा.क्र.नमुंमपा/आ.व्य./937/2020.
दिनांक : 05/11/2020

# नवी मुंबई महापालिका कार्यक्षेत्रात कंन्टेनमेंट झोन मधील लॉकडाऊन सुधारित आदेश

**संदर्भ** :1) भारतीय साथरोग नियंत्रण अधिनियम, 1897 व महाराष्ट्र कोव्हीड-19 उपाययोजना नियम, 2020.

2) आपत्ती व्यवस्थापन कायदा 2005.

3) महसूल व वने, आपत्ती व्यवस्थापन मदत व पुनर्वसन विभाग, महाराष्ट्र शासन यांचे कडील आदेश क्र. डीएमयू-2020/सीआर-92/Dism-1, दि.14 ऑक्टोंबर 2020.

4) नमुंमपा आदेश क्र. जा.क्र.नमुंमपा/आ.व्य./892/2020 दिनांक 15/10/2020.

5) महसूल व वने, आपत्ती व्यवस्थापन मदत व पुनर्वसन विभाग, महाराष्ट्र शासन यांचे कडील आदेश क्र. डीएमयू-2020/सीआर-92/Dism-1, दि.29 ऑक्टोंबर 2020 रोजीचे आदेश.

6) नमुंमपा आदेश क्र. जा.क्र.नमुंमपा/आ.व्य./928/2020 दिनांक 29/10/2020.

7) नमुंमपा आदेश क्र. जा.क्र.नमुंमपा/आ.व्य./914/2020 दिनांक 23/10/2020.

8) महसूल व वने, आपत्ती व्यवस्थापन मदत व पुनर्वसन विभाग, महाराष्ट्र शासन यांचे कडील आदेश क्र. डीएमयू-2020/सीआर-92/Dism-1, दि. 03 नोव्हेंबर 2020.

**ज्याअर्थी,** नवी मुंबई महानगरपालिका कार्यक्षेत्रातील हॉटस्पॉट क्षेत्रामधील COVID-19 चा वाढता प्रादुर्भाव पाहता, साथरोग नियंत्रण अधिनियम, 1897 च्या कलम 2 अन्वये, तसेच आपत्ती व्यवस्थापन अधिनियम, 2005 च्या सर्व संबंधित तरतूदींसह प्राप्त अधिकारांचा वापर करुन, **आयुक्त, नवी मुंबई महानगरपालिका यांनी उपरोक्त संदर्भ क्र. 6 च्या आदेशान्वये परिशिष्ट-अ अन्वये जाहीर केलेल्या हॉटस्पॉट व वेळोवेळी जाहीर केलेल्या कन्टेनमेंट क्षेत्रामध्ये दिनांक 30/11/2020 रोजी, मध्यरात्री 12:00 वाजेपर्यंत लॉकडाऊन सुरु राहील, असे जाहीर केले आहे,**

**आणि ज्याअर्थी,** महाराष्ट्र शासनाने संदर्भ क्र.8 च्या आदेशाव्दारे संदर्भ क्र.3 च्या आदेशामध्ये सुधारणा करुन काही बाबींचा समावेश करण्यात आलेला आहे. त्याअनुषंगाने नमुंमपाच्या संदर्भ क्र.4 च्या आदेशामध्ये देखील सुधारणा करुन खालील बाबींना नवी मुंबई महानगरपालिका कार्यक्षेत्रातील कन्टेनमेंट क्षेत्र वगळता दिनांक 05 नोव्हेंबर 2020 पासून परवानगी देण्यात येत आहे.

1. केवळ राज्यस्तरीय खेळाडू व राष्ट्रीय स्तरावरील आणि आंतरराष्ट्रीय स्तरावरील खेळाडू यांना तरणतलाव वापरण्यास परवानगी देण्यात येत आहे. याकरीता क्रीडा व युवक संचालनालय यांचेमार्फत निर्गमित करण्यात आलेल्या प्रमाण कार्यप्रणालीचे (SOP) पालन करण्यात यावे. सदर प्रमाण कार्यप्रणाली केंद्रीय युवा कार्यक्रम आणि क्रीडा मंत्रालय, भारत सरकार यांचेमार्फत निर्गमित करण्यात आलेल्या प्रमाण कार्यप्रणालीच्या (SOP) आधारे बनविलेली असेल.

2. योग प्रशिक्षण संस्था यांना परवानगी देण्यात येत आहे. याकरीता सार्वजनिक आरोग्य विभाग यांचेमार्फत निर्गमित करण्यात आलेल्या प्रमाण कार्यप्रणालीचे (SOP) पालन करण्यात यावे. सदर प्रमाण कार्यप्रणाली केंद्रीय आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्रालय, भारत सरकार यांचेमार्फत निर्गमित करण्यात आलेल्या प्रमाण कार्यप्रणालीच्या (SOP) आधारे बनविलेली असेल.

3. सर्व Indoor Sports जसे बॅडमिंटन, टेनिस, स्क्वॅश, इनडोअर शुटींग रेंजेस इत्यादी खेळांना सामाजिक अंतर व स्वच्छतेच्या नियमांचे पालन करुन परवानगी देण्यात येत आहे.

4. सिनेमा हॉल्स, थिएटर्स, मल्टीप्लेक्सेस, नाटयगृहे यांना एकूण आसन क्षमतेच्या 50% क्षमतेने सुरु ठेवण्यास परवानगी राहील. सिनेमा हॉल्स, थिएटर्स, मल्टीप्लेक्सेस, नाटयगृहातील प्रेक्षागृहामध्ये खाद्यपदार्थ नेण्यास सक्त मनाई राहील. याकरिता सांस्कृतिक कार्य विभाग यांचेमार्फत निर्गमित करण्यात आलेल्या प्रमाण कार्यप्रणालीचे (SOP) पालन करण्यात यावे. सदर प्रमाण कार्यप्रणाली केंद्रीय माहिती व प्रसारण मंत्रालय, भारत सरकार यांचेमार्फत निर्गमित करण्यात आलेल्या प्रमाण कार्यप्रणालीच्या (SOP) आधारे बनविलेली असेल.

हॉटस्पॉट व कन्टेनमेंट क्षेत्रामध्ये यापूर्वी वेळोवेळी जाहीर केल्याप्रमाणे सर्व निर्बंध लागू राहतील. तसेच शासनाने वेळोवेळी जाहीर केल्याप्रमाणे सोशल डिस्टंसिंग, मास्कचा वापर व इतर उपाययोजना अनिवार्य राहील.

उक्त कालावधीतील प्रतिबंधीत क्षेत्रामधील लॉकडाऊनचे उल्लंघन करणारी कोणतीही व्यक्ती / संस्था यांचेवर साथरोग अधिनियंम 1897, आपत्ती व्यवस्थापन अधिनियम 2005 मधील कलम 51 ते 60 अन्वये तसेच, भारतीय दंड संहिता यामधील कलम 188 अन्वये कारवाई केली जाईल.

**सदर आदेशाची काटेकोरपणे अंमलबजावणी करण्यात यावी.**

05/11/2020

( अभिजीत बांगर )
आयुक्त
नवी मुंबई महानगरपालिका

प्रत :

1. मा. मुख्यमंत्री महोदयांचे प्रधान सचिव.
2. मा. पालकमंत्री ठाणे तथा मंत्री नगरविकास विभाग महोदयांचे खाजगी सचिव.
3. मा. मुख्य सचिव महोदयांचे विशेष कार्य. अधिकारी.
4. मा. विभागीय आयुक्त, कोकण विभाग, नवी मुंबई.
5. मा. पोलीस आयुक्त, नवी मुंबई.
6. जिल्हाधिकारी, ठाणे.
7. अतिरिक्त आयुक्त -1 आणि 2 नमुंमपा.
8. उप आयुक्त (मुख्यालय) आणि उप आयुक्त- परिमंडळ 1 व 2, नमुंमपा.
9. वैदयकिय आरोग्य अधिकारी, नमुंमपा.
10. सहा. आयुक्त तथा विभाग अधिकारी (सर्व 8 विभाग कार्यालय), नमुंमपा.